## निवडक




साखळी : मतदारसंघात तिरंगा यात्रेत सहभागी झालेले मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत देशप्रेमी नागरिक कार्यकर्ते.

### साखळीत जवानांच्या समर्थनार्थ भव्य तिरंगा यात्रा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १७** : पाक पुरस्कृत आतंकवाद ठेचुन काढताना दहशतदाद्यांना पाकिस्तानात घुसून चारी मुंड्या चित करत त्यांचे तळ उध्वस्त केले. भारतीय सैनिकांनी भारताची ताकद जगाला दाखवून दिली. भारतीय जवानांच्या शौर्याला सारा देश सलाम करीत आहे.असे उदगार मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनि साखळीत काढले.

आमचा लढा हा कोणा देशाविरुद्ध किंवा धर्माविरुद्ध नसून दहशतवादी ताकद उध्वस्त करीत ती कायमची ने स्तनाबूत करणे हा आमच्या देशाचा संकल्प आहे आणि त्या कार्यात शूरवीरांना आमचा सलाम अशा शब्दात मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी भारतीय सैनिकांच्या शौर्याच कौतुक करताना त्यांच्या सम र्थनार्थ आयोजित भव्य तिरंगा यात्रेत बोलताना केले. साखळी शहरात तिरंगा यात्रेचे भव्य आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, विविध पंचायतींचे प्रतिनिधी व कार्यकर्ते व देश प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी भारतीय सैनिकांच्या शौर्याच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. भारतीय जवानांचा जोश वाढवण्यासाठी या तिरंगी यात्रेचे आयोजन करण्यात आले असून संपूर्ण देश जवानांच्या पाठीशी खंबीर उभा आहे. आतंकवादाच्या विरोधात आमची ही लढाई असून दहशतवादपूर्ण ठेचून गाडेपर्यंत भारत गप्प बसणार नाही. हा आतंकवाद संपवणे आमच उद्दिस्ट असून आम्ही कोणाच्या धर्म व देशाच्या विरोधात नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली भारतीय सैनिकांनी केलेली कामगिरी लाजवाब असून हा लढा अद्याप संपलेला नाही. जोपर्यंत संपूर्ण दहशतवादाचा बिमोड होत नाही तोपर्यंत भारतीय सैनिक त्यासाठी भारत लढत राहील. पाक व्याप्त काश्मीर ताब्यात घेतल्याशिवाय भारत गप्प बसणार नाही अशा प्रकारचे उद्गार मुख्यमंत्र्यांनी यावेळी काढले.

तिरंगा यात्रेत युवा महिला ज्येष्ठ सामान्य नागरिकांचा मोठ्या संख्येने भारत प्रेमींनी उपस्थिती लावली होती

### तिशे कोठंबी विज ट्रान्सफॉर्मरवर आज खंडित वीजपुरवठा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. १७** : रविवार दि. १८ मे २०२५ रोजी नविन तिशे कोठंबी वीज ट्रान्सफॉर्मरवर सकाळी ९.३० ते दुपारी १२ वाजता यावेळेत वीज वाहिन्याना लागणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडायच्या असल्याने तसेच वीज वाहिन्यांचे देखभालीचे काम करायचे असल्याने नविन तिशे कोठंबी परिसरात वीजपुरवठा असणार नाही. यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### मोहन कळंगुटकर, दयानंद साळगावकर यांचा सन्मान

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि. १७** : अँटी करप्शन फाउंडेशन ऑफ इंडिया गोवा शाखेतर्फे पी.एस.आय मोहन कलंगुटकर तसेच ए.एस.आय दयानंद साळगावकर यांचा अँटी करप्शन फाउंडेशनचे संचालक संजय उर्फ बाबू विर्नोडकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी अँटीकरप्शन फाउंडेशन गोवाचे सदस्य सर्वेश रायकर ,तुषार शिरोडकर रोहित देसाई डिमेलो, पांडुरंग कुंभार, जयेंद्रनाथ पाडोलकर, धनराज मांद्रेकर, नूतन आसोलकर, अनिता वेंगुर्लेकर आदी उपस्थित होते. तसेच यावेळी नवीन सदस्यांना प्रमाणपत्र देण्यात आली.

संजय विर्नोडकर यांनी सांगितले की, अँटी करप्शन फाउंडेशन तर्फे आतापर्यंत अनेक उपक्रम राबविण्यात आले, त्यामध्ये आसगाव येथील महिला आश्रमाला फळांचे तसेच कपड्यांचे वाटप करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर्वेश रायकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन तुषार शिरोडकर यांनी केले.

# ‘एनआयओ’चा अहवाल अवास्तव : खासदार फर्नांडिस यांचा आरोप

## सर्व ४० आमदारांनी म्हादई वाचवण्यासाठी पंतप्रधानांची भेट घेण्याचे काँग्रेसचे आवाहन

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**पणजी, दि. १७** : म्हादई नदी वळवण्याबाबत राष्ट्रीय समुद्रशास्त्र संस्थेने (एनआयओ) सादर केलेल्या अहवालावर गोवा प्रदेश काँग्रेस समितीने तीव्र नाराजी व्यक्त करत, हा अहवाल पक्षपाती असून केवळ टेबलटॉप पद्धतीने तयार करण्यात आल्याचा आरोप केला आहे. या अहवालात जमिनीवरील वास्तव प्रतिबिंबित होत नाही, अशी टीका काँग्रेसने केली आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी आज सकाळी माध्यमांशी संवाद साधताना स्पष्ट केले की, एनआयओचा हा अहवाल राज्य सरकारच्या वतीने सादर करण्यात आलेला नाही. तसेच, अहवालातील निष्कर्षांचा गोव्याने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर कोणताही परिणाम होणार नसल्याचा दावा त्यांनी केला.

दरम्यान, दक्षिण गोव्याचे खासदार विरियातो फर्नांडिस यांनी शनिवारी पणजीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत म्हादई प्रकल्पाविषयी जोरदार भूमिका मांडली. हा अहवाल वस्तुस्थिती आधारावर नाही. तो केवळ जलशास्त्रीय विश्लेषणावर आधारित आहे, ज्यात पर्यावरणीय घटकांना दुर्लक्ष केले गेले आहे, असे फर्नांडिस यांनी सांगितले. याबाबट अधिक माहिती देताना खा. विरीयातो म्हणाले की, हा अहवाल केवळ पाण्याशी संबंधित असून तो पावसाळ्यात तयार केलेला आहे. पावसाळ्यात नद्यांमध्ये पाण्याची पातळी जास्त असल्याने त्याच्या आधारे हा अहवाल तयार केला आहे. खरेतर हा अहवाल सर्व ऋतूंवर लक्ष केंद्रीत करुन तयार करणे अपेक्षित होते. म्हादईचे पाणी वळवले तर म्हादई व भीमगड अभयारण्यासह गोव्याच्या भागांना ग्लोबल वॉर्मिंग, कार्बन फिक्सिंग यासारख्या परिणामांनाही सामोरे जावे लागेल.

एनआयओने हा अहवाल एप्रिल २०२४ मध्ये तयार केला होतो. सदर अहवाल पूर्णपणे अयोग्य असूनही सरकार त्यावर मौन बाळगून आहे. यावरुन ते म्हादईप्रश्नी गंभीर नाही हे स्पष्ट होते. उलट म्हादईचे पाणी वळवले तर उत्तर गोव्यातील ४३ टक्के भागावर त्याचा परिणाम जाणवेल. पश्चिम घाटातील पर्यावरण संवेदनशील भागातच कर्नाटककडून कळसा–भांडूरा व हलतारा हे धरणे बांधली जात आहेत. पर्यावरणावर हा आघात असल्याचे विरियातो यांनी सांगितले.

खासदार फर्नांडिस यांनी यावेळी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, आयआयटी मुंबई, अशोका ट्रस्ट फॉर रिसर्च इन इकॉलॉजी अँड द एन्व्हायर्नमेंट, तसेच नॉर्वेजियन इन्स्टिट्यूट फॉर वॉटर रिसर्च या संस्थांकडून सादर करण्यात आलेल्या चार स्वतंत्र अभ्यास अहवालांचा हवाला दिला. या सर्व अहवालांमध्ये म्हादईचे पाणी वळवण्यात आल्यास गोव्याचे खारे वाळवंटीकरण होईल आणि त्यामुळे स्थानिक परिसंस्थेवर गंभीर परिणाम होतील, असा इशारा दिला आहे. गोव्याच्या नद्या (विशेषतः मांडवी नदी) या किनारी आणि नाजूक प्रवाह असलेल्या नद्या आहेत. त्यांचा प्रवाह अडवल्यास खारट पाणी आत शिरते, जैवविविधता धोक्यात येते आणि हजारो लोकांचे जीवनमान कोलमडते, असे फर्नांडिस म्हणाले.

फर्नांडिस यांनी म्हादई वन्यजीव अभयारण्यातील वाढत्या वाघ, बिबटे आणि काळ्या चित्त्यांच्या हालचालींवर लक्ष वेधले. म्हादईमध्ये व्याघ्र प्रकल्प तातडीने जाहीर करण्याची गरज आहे. कर्नाटकातील प्रस्तावित धरणांमुळे अभयारण्याला धोका निर्माण झाला आहे. ही धरणं ‘इको सेन्सिटिव्ह’ झोनमध्ये असून ती केवळ पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करत नाहीत, तर पर्जन्यवृष्टी नियंत्रित करणारे आणि कार्बन साठवणारे महत्त्वाचे वनसंपदेचे मार्गही धोक्यात आणतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

कर्नाटक सरकारच्या पाणी वळवणाच्या धोरणावर गंभीर प्रश्न उपस्थित करत फर्नांडिस म्हणाले की, कर्नाटकातील ऊस शेती आणि शीतपेय उद्योगांच्या पाण्याच्या गरजांपोटी गोव्याच्या पर्यावरणाची बलि दिली जाते आहे. कर्नाटकने स्वतःचे जलस्रोत पुनरुज्जीवित करण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, जेणेकरून ही समस्या दीर्घकालीन आणि शाश्वत पद्धतीने सोडवता येईल. गोवा सरकार या मुद्द्यावर निष्क्रिय आहे. आता वेळ आली आहे की सर्व ४० आमदार आणि तिन्ही खासदारांनी राजकीय मतभेद विसरून दिल्लीकडे मोर्चा वळवावा. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्वतः हस्तक्षेप करावा यासाठी जनतेचा दबाव वाढवायला हवा,असे आवाहन फर्नांडिस यांनी केले. या पत्रकार परिषदेला गोवा प्रदेश काँग्रेस अध्यक्ष अमित पाटकर, दक्षिण गोवा जिल्हाध्यक्ष सॅव्हियो डिसिल्वा आणि काँग्रेस नेते वीरेंद्र शिरोडकर उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने म्हादईच्या रक्षणासाठी निर्णायक पावले उचलण्याची गरज अधोरेखित केली.

## स्ट्रीट प्रोव्हिडन्स निधी वितरणासंदर्भात सकारात्मक आश्वासन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १७** : मानसिक आरोग्य सेवा आणि पायाभूत सुविधांच्या कमतरतेसंदर्भातील समस्यांवर आवाज उठवणाऱ्या स्ट्रीट प्रोव्हिडन्स या स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधींनी शुक्रवारी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची अधिकृत निवासस्थानी भेट घेतली. संस्थेला मिळणाऱ्या निधीत होणाऱ्या विलंबावर त्यांनी मुख्यमंत्री यांच्या समोर चिंता व्यक्त केली.

बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना संस्थेचे संस्थापक आणि विश्वस्त डोनाल्ड फर्नांडिस यांनी सांगितले की, मुख्यमंत्र्यांनी आम्हाला बोलावून घेतले आणि आमच्या समस्या ऐकून घेतल्या. त्यांनी आश्वासन दिले आहे की पुढील सात दिवसांत दोन महिन्यांचा निधी उपलब्ध करून दिला जाईल.

संस्थेचे दुसरे स्वयंसेवक बॉस्को जॉर्ज यांनीही मुख्यमंत्री सकारात्मक असल्याचे नमूद केले. त्यांनी सांगितले. निधी वितरणासंबंधित काही प्रक्रियात्मक औपचारिकता अद्याप बाकी आहेत. आतापर्यंत हा निधी महिला व बालविकास विभागाकडून दिला जात होता, परंतु आता तो समाज कल्याण विभागाकडून दिला जाणार आहे. त्यामुळे काही बारकावे तपासले जात आहेत. तात्पुरती व्यवस्था म्हणून विद्यमान अर्थसंकल्पातून आगाऊ निधी देण्याचा पर्याय सुचवण्यात आला आहे.

फर्नांडिस यांनी स्पष्ट केले की, मार्च २०२५ पर्यंत निधी महिला व बालविकास विभागाद्वारे वितरित करण्यात आला होता. एप्रिलपासून संबंधित फाइल समाज कल्याण विभागाकडे सुपूर्द करण्यात आली असून, त्यामुळे निधीप्राप्ती प्रक्रिया अडथळ्यांत सापडली आहे.

या बैठकीदरम्यान, संस्थेने गोव्यातील मानसिक आजारांनी ग्रस्त व असुरक्षित नागरिकांसाठी असलेल्या सुविधांची कमतरता अधोरेखित केली. मुख्यमंत्र्यांना सूचित करण्यात आले की राज्यात कुठलेही आश्रयस्थान उपलब्ध नाही, इन्स्टिट्यूट ऑफ सायकियाट्री ॲण्ड ह्यूमन बिहेवियर’ येथे मुलांसाठी स्वतंत्र वॉर्ड नाही. तसेच, गोवा पोलिस बेघर व्यक्तींना मदत करण्यात कमी पडतात आणि राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात मानसिक रुग्णालये नाहीत, असे फर्नांडिस यांनी सांगितले.

फर्नांडिस यांनी हे ही स्पष्ट केले की, स्ट्रीट प्रोव्हिडन्स संस्था आता इतर राज्यांतील मानसिक आजारी नागरिकांना स्वीकारणार नाही. आम्ही मुख्यमंत्र्यांना कळवले की आम्ही आता इतर राज्यांतील मानसिक रुग्णांना घेणार नाही. यावर मुख्यमंत्री सावंत यांनी आश्वासन दिले की, ते संबंधित राज्य सरकारांना पत्र लिहून त्यांच्या नागरिकांची जबाबदारी घेण्याची विनंती करतील, असे फर्नांडिस यांनी सांगितले.

संस्थेने मानसिक विकाराच्या सुरुवातीच्या टप्प्यातील रुग्णांची ओळख पटवण्यासाठी ग्रामीण पातळीवर कार्यक्रम राबविण्याचा प्रस्तावही सादर केला. आमचा प्रस्ताव आहे की, आम्ही गावोगाव जाऊन लोकांशी थेट संवाद साधू आणि मानसिक आरोग्य समस्या असलेल्या व्यक्तींना पुढे येण्यास प्रवृत्त करू, असे फर्नांडिस यांनी स्पष्ट केले.

## अटल आश्रय निधीचा गैरवापर रोखणार : मुख्यमंत्री

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १७** : अटल आश्रय योजनेच्या निधीचा काही लाभार्थींकडून गैरवापर होत असल्याचे निदर्शनास आल्याने राज्य सरकारने कडक भूमिका घेतली आहे. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी शनिवारी साखळी येथे आयोजित विशेष शिबिरात बोलताना स्पष्ट इशारा दिला की, ही आर्थिक मदत केवळ घर बांधकाम अथवा दुरुस्ती यासाठीच वापरली गेली पाहिजे, अन्यथा कठोर कारवाई केली जाईल.

ही रक्कम कार खरेदी अथवा अन्य कोणत्याही वैयक्तिक खर्चासाठी वापरण्यात आली, तर संबंधित लाभार्थ्यांविरोधात वसुलीची कारवाई केली जाईल, असे सावंत यांनी ठणकावून सांगितले. विभागीय तपासणी आणि प्राप्त तक्रारींनुसार योग्य ती चौकशी करून आवश्यक ती पावले उचलली जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना दिलासा देताना मुख्यमंत्री सावंत यांनी आश्वासन दिले की, पात्र लाभार्थ्यांचा पहिला हप्ता रु. ७५,००० एका महिन्याच्या आत त्यांच्या खात्यात जमा केला जाईल. कोणत्याही प्रलंबित अर्जाची दखल घेतली जाईल आणि निधी वितरणात दिरंगाई होणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

राज्यात समाज कल्याण संचालनालयाच्या माध्यमातून राबविली जाणारी अटल आश्रय योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी महत्त्वाची योजना आहे. या योजनेअंतर्गत वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या अर्जदारांना घर बांधण्यासाठी ३ लाख रुपयांपर्यंत तर घर दुरुस्तीसाठी १.५ लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते. ही योजना विशेषतः अनुसूचित जाती, जमाती तसेच इतर मागासवर्गीय घटकांसाठी उपयुक्त ठरली आहे. सरकारकडून सध्या राज्यभर विशेष मोहीम राबविण्यात येत असून अर्ज प्रक्रियेला गती देण्यात आली आहे.

या विशेष मोहिमेच्या माध्यमातून आतापर्यंत २५०० पेक्षा अधिक लाभार्थ्यांना एकूण ५६ कोटी रुपयांची मदत वितरित करण्यात आली आहे. सरकारचा उद्देश गरजू नागरिकांना योग्य वेळी आणि योग्य हेतूसाठी मदतीचा लाभ मिळावा, हा असून यामध्ये कोणत्याही प्रकारची अकार्यक्षमता वा गैरप्रकार सहन केला जाणार नाही, हे मुख्यमंत्री सावंत यांनी स्पष्टपणे अधोरेखित केले.

## फोंडा राजीव कला मंदिरात ‘कोर्ट मार्शल’चा उद्या विशेष प्रयोग

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १७** : जवानांच्या जीवनावर आधारित वरद क्रिएशन प्रस्तुत आणि कला उन्मेष डिचोली निर्मित क्षणाक्षणाला उत्कंड वाढविणार दोन अंकी मराठी कोर्ट मार्शल हे नाटक आपल्या जवानांच्या प्रती आदर व्यक्त करण्यासाठी असून.

सोमवार दि. १९ रोजी सायंकाळी ७.३०वाजता राजीव कला मंदिर फोंडा येथे विशेष प्रयोग होणार आहे.

कला उमेश निर्मित नाट्य रूपांतर लेखक व दिग्दर्शक नरेश कडकडे निर्मिती प्रमुख वैभव कळंगुटकर व इतर कलाकारांची टीम यांनी अतिशय तळमळीने हे नाटक साकारले आहे, क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारा जीव घेणा संघर्ष मल्याळम चित्रपटावर आधारित दोन अंकी हे मराठी नाटक डिचोली साखळी या ठिकाणी यापूर्वी सादर करण्यात आले, त्याला नाट्य रसिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला आहे. फोडा येथे सोमवारी होणाऱ्या या नाट्यप्रयोगालाही मोठ्या प्रमाणात नाट्य रसिकांनी सहकार्य द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे







## कार चोरीप्रकरणी कर्नाटकच्या तिघांना अटक

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**कळंगुट, दि. १७ :** बागा, कळंगुट येथे यावर्षी जानेवारी महिन्यात घडलेल्या कार चोरी प्रकरणात कळंगुट पोलिसांनी तिघा संशयितांना अटक केली आहे. हे आरोपी कर्नाटकातील बेळगावी जिल्ह्यातील रहिवासी असून, त्यांच्याकडून चोरी गेलेली कार जप्त करण्यात आली आहे.

कळंगुट पोलिस स्थानकात दाखल फिर्यादीनुसार, २८ जानेवारी रोजी दयानंद हिरेमठ (विजापूर, कर्नाटक) यांनी तक्रार दिली होती की, त्यांचे मित्र चन्ना बसप्पा वाग्गारा यांची कार बागा येथे मोकळ्या जागेतील पार्किंगमध्ये ठेवलेली असताना, २३ जानेवारी ते २४ जानेवारीच्या मध्यरात्री दरम्यान चोरीला गेली. गुन्हा घडल्यानंतर कळंगुट पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान करत सखोल चौकशी सुरू केली. तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी कार आणि संशयित आरोपी बेळगावी जिल्ह्यात असल्याचा शोध लावला.

शनिवारी शापूर पोलिसांच्या सहकार्याने बेळगावी जिल्ह्यातील विविध ठिकाणांवर एकाच वेळी धाड टाकून तीनही आरोपींना अटक करण्यात आली. अटकेत आलेल्या आरोपींची नावे अशी आहेत – मारुती जान्टिकट्टी (२६), किशोर रंगरेज (२८) आणि अब्दुल अझीझ मजावर (२६). पोलिसांनी चोरी गेलेली कार देखील त्यांच्या ताब्यातून जप्त केली आहे.

कळंगुट पोलिस ठाण्याचे निरीक्षक नेविल फर्नांडिस यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. पुढील तपास सुरू असून, आरोपींनी याआधीही अशा स्वरूपाचे गुन्हे केले आहेत का, याचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे.

## पोलिसावर हल्ला : आरोपी अद्याप मोकाट

■ *ऑगस्टो रॉड्रिग्ज*
*टीम दैनिक हेराल्ड*

### पीडिताच्या आईची न्यायासाठी हाक

**पणजी, दि. १७** : जर पोलिस दलात कार्यरत असलेल्या व्यक्तीला न्याय मिळत नसेल, तर सामान्य नागरिकांनी कुणाकडे अपेक्षा करायची? असा संतप्त सवाल सहासष्ट वर्षीय मंगल नार्वेकर यांनी केला आहे. त्यांच्या मुलावर झालेल्या हल्ल्यानंतर संबंधित मुख्य आरोपीला अद्याप अटक न झाल्याने त्यांची ही प्रतिक्रिया समोर आली आहे.

मंगल यांचा मुलगा रोहन नार्वेकर हा केपे पोलिस ठाण्यात पीसी ड्रायव्हर म्हणून कार्यरत आहे. १ मे २०२५ रोजी पहाटे ड्युटीवर असताना त्याच्यावर कथितपणे जॉयसन फर्नांडिस व सहा अज्ञात व्यक्तींनी हल्ला केला. या घटनेला आता १५ दिवस उलटले, तरी जॉयसनला अटक झालेली नाही.

या प्रकरणात रोहनने ९ मे रोजी जॉयसन आणि इतरांविरोधात पुरवणी तक्रार दाखल केली. यामध्ये शासकीय कर्मचाऱ्याच्या कामात अडथळा, अपशब्द वापरणे, गंभीर दुखापत करणे आदी आरोप बीएनएसच्या कलम २२१, ३५२, १३२, १२१(१), ११६ आणि ३(५) अंतर्गत नोंदवण्यात आले.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रारंभी दाखल तक्रारीनंतर चार जणांना अटक करण्यात आली होती; मात्र मुख्य आरोपी जॉयसन फर्नांडिस मात्र अटकेपासून वाचला. त्याने १३ मे रोजी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला आणि त्याला तत्काळ दिलासा मिळाला.

आमच्या सहकाऱ्यावर हल्ला करणारा व्यक्ती खुलेआम वावरतोय. आम्ही पोलिस तपास पथकाला त्याच्या वाढदिवसाचा फोटोही दिला, तरी ते त्याला शोधू शकले नाहीत, अशी नाराजी एका कनिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर व्यक्त केली.

केपेचे एसडीपीओ आशिष शिरोडकर यांनी मात्र संयमित प्रतिक्रिया देताना सांगितले, हो, ही घटना खेदजनक आहे. मात्र आपण एकच प्रसंग म्हणून पाहावा. संपूर्ण यंत्रणेबाबत निष्कर्ष काढण्याआधी मोठे चित्र पहावे.

पोलिसांच्या मनोबलावर परिणाम करणाऱ्या या घटनेबाबत कार्यकर्ते आणि संशोधक स्वप्नेश शेर्लेकर यांनी तीव्र शब्दांत मत व्यक्त केले. पोलिसांचा वापर अनेकदा बेकायदेशीर व अपारदर्शक कामांमध्ये होतो. अशा वेळी जेव्हा एखादा पोलिस कर्मचारी हल्ल्याचा बळी ठरतो, तेव्हा त्याला मिळणाऱ्या न्यायाविषयी शंका निर्माण होते, असे ते म्हणाले.

पोलिसांवर हल्ला झाल्यानंतरही आरोपी मोकाट फिरत असल्याचे अनेक प्रकरणे समोर आली आहेत. ही गोष्ट कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या मनोबलासाठी घातक आहे, असेही शेर्लेकर यांनी स्पष्ट केले. मंगल नार्वेकर यांच्या मते, जॉयसन फर्नांडिसला काही दिवसांपूर्वी कुडचडे येथील एका पीएसआयला अटक करण्यात आल्यानंतरही मोकळे सोडण्यात आल्याने त्यांचा विश्वासच डळमळीत झाला आहे. माझा मुलगा रुग्णालयात होता, घरी विश्रांती घेत आहे, आणि ज्याने त्याच्यावर हल्ला केला तो मोकाट आहे. यामध्ये काहीतरी चुकतंय, असा आरोप त्यांनी केला. या प्रकरणावर पत्रकारांनी संपर्क साधल्यावर दक्षिण गोव्याचे पोलिस अधीक्षक टिकम सिंग वर्मा यांनी, घटना लक्षात आहे, पण मी सध्या व्यस्त आहे. नंतर सविस्तर माहिती देतो,असे सांगून पुढील प्रतिक्रिया टाळली.

MBBS



Ministry Of Health Of Russia
**SMOLENSK STATE MEDICAL UNIVERSITY, RUSSIA**
**Invites Indian students for direct Government Admissions**
**Recognized by India, WHO, USA & UK, Min. Qual. 50% in XII in PCB**
**Satisfies all requirements of NMC of India**
**UNIVERSITY** – 105 years old Medical University. The University is situated in the center of the Smolensk city. Smolensk is situated 380 km west of Moscow. Very high standards of education, strict disciplinary system. **2170** Indian students (**960** Girls) studying, **244** getting degree in **2025.** Duration 6 years including internship and License. English Medium in all years, Closed type campus system, **8** attached hospitals (**9000** Beds).
**MCI SCREENING TEST** – Our graduates of **2008** to **2024** have given **BEST** results among graduates of all foreign medical colleges (Official web sites of Indian Embassy, Moscow and NBC conducting Screening Test confirm this). Dr. Aadi Morakhia, our graduate of 2023, has topped Screening Test 2023.
**SPECIAL HOSTELS ONLY FOR INDIAN STUDENTS (BEST HOSTELS IN RUSSIA)** 2 and 4 seated big rooms, separate hostels for boys and girls.
**INDIAN MESS** - Mess with **Indian food** cooked by **Indian cooks**.
**Fee** (Tuition+Hostel+Med.Ins.) – **USD 6000** (Approx. Rs. 5,10,000/-) per year and one time payment of Rs.1,50,000/- (By Bank Draft only) which includes – Admission procedure, invitation letter, student visa, air ticket Delhi - Moscow.
**Scholarship to all Indian students.**
Bank loans are available from Indian banks.
Contact: **DR. ALOK AERON +7 9605805555 (Russia)**
**Official web site: www.sgmu.info Instagram: @sgmu.info**
**Admission details: admission.sgmu.live**
**INFORMATION CENTERS: (These are parents of our students)**
**Margao:** Mr. Desai – 9850466525
**Ponda:** Mr. Chodankar – 8010274925
**Mapusa:** Mr. Kauthankar – 9823674160
**Curchorem:** Mrs. Naik – 9130630410